महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २८६ वे दिनांक : १२/१०/२०२६ वार : सोमवार

## ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात ठाकरे बंधूंचा एल्गार; आदित्य ठाकरेंची उद्या पुन्हा आंदोलनाची घोषणा



**मुंबई** : निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधातील आंदोलनावरून मुंबईत राजकीय वातावरण तापले आहे. शिवाजी पार्क पोलिस ठाण्यात आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे दाखल झाले. यावेळी मनसे आणि ठाकरे सेनेच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. पोलिसांशी चर्चा केल्यानंतर आदित्य ठाकरे यांनी उद्या पुन्हा आंदोलन करण्याची घोषणा केली. तसेच, ज्ञानेश कुमार यांच्याविरोधातील लढा सुरूच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आदित्य ठाकरे यांनी सांगितले की, पोलिसांसोबत चर्चा झाली असून त्यांनी सहकार्य केले आहे. ताब्यात घेतलेल्या आंदोलकांना सोडण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

ज्ञानेश कुमार यांच्याविरोधातील आंदोलन मागे घेतले जाणार नसल्याचे आदित्य ठाकरे यांनी स्पष्ट केले. उद्या पुन्हा आंदोलन करण्यात येणार असून, या आंदोलनाची सविस्तर माहिती ट्विटरवरून देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे उद्याच्या आंदोलनाकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आंदोलकांना सोडण्याचे आदेश दिल्याची माहिती देताना आदित्य ठाकरे यांनी पोलिसांसोबत झालेल्या चर्चेचा उल्लेख केला. मात्र, ज्ञानेश कुमार यांच्याविरोधातील लढा पुढेही सुरू राहील, अशी भूमिका त्यांनी मांडली.

दरम्यान, शिवाजी पार्क पोलिस ठाण्याबाहेर मनसे आणि ठाकरे सेनेच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या घोषणाबाजीमुळे परिसरात राजकीय वातावरण तापले होते. आता उद्याच्या आंदोलनाबाबत आदित्य ठाकरे काय भूमिका मांडतात आणि आंदोलनाचे स्वरूप काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## 'तिन्ही पक्ष सहा महिने भांडले आणि आता गळ्यात गळे घातले':सतेज पाटलांचा महायुतीवर हल्लाबोल



**कोल्हापूर** : जिल्हा दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळच्या निवडणुकीचा रणसंग्राम सुरू झाला असून, या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापल्याचे पाहायला मिळत आहे. आज काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील राजर्षी शाहू समविचारी आघाडीचा प्रचार शुभारंभ करण्यात आला. गोकुळचे संस्थापक आनंदराव पाटील चुयेकर यांच्या करवीर तालुक्यातील चुये गावातील स्मारकाला अभिवादन करून प्रचाराचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी बोलताना सतेज पाटील यांनी महायुतीवर जोरदार टीका केली.

सतेज पाटील यांनी महायुतीवर जोरदार घणाघात केला आहे. तिन्ही पक्ष सहा महिने भांडले, दूध संस्थांना वेठीस धरले आणि आता गळ्यात गळे घातले, असा टोला सतेज पाटील यांनी महायुतीला लगावला. त्यामुळे शिट्टी विजयी करा आणि महायुतीचा सहा महिन्यांचा तमाशा संपवा, असे आवाहनही त्यांनी केले. इतकेच नाही, तर महायुतीचे नेते ठरावधारकांकडून शपथा घेत असल्याचा मुद्दा उपस्थित करत मग तुमचा त्यांच्यावर विश्वास नाही का? असा सवालही सतेज पाटील यांनी केला.

महायुतीच्या नेत्यांची नुरा कुस्ती आहे, सहा महिने झालं नुसतीच खडखडी सुरु आहे. आमची लढाई साडेपाच लाख लोकांच्या संसारासाठी, गोकुळ टिकवण्यासाठी असल्याचे पाटील म्हणाले. जिल्हाचे अर्थकारण जीवंत ठेवण्यासाठी गोकुळ जिवंत ठेवा. विकासाची शिट्टी वाजवण्यासाठीच आम्हाला शिट्टी चिन्ह मिळाल्याचे पाटील म्हणाले. महायुतीचे उमेदवार सिंगल वोटिंग मागणार नाहीत, यासाठी शपथ घेतात, आमचे उमेदवार दूध उत्पादकांची सेवा करण्याची शपथ घेणार असल्याचे पाटील म्हणाले. सरदार पटेल डेअरी फेडरेशनमध्ये घेऊन गोकुळला संपवणे महायुतीचा मोठा अजेंडा असल्याचे पाटील म्हणाले.

चुयेकर साहेब कायमपणे आमच्या हृदयात आहेत. पण महायुती त्यांना फक्त पत्रकावर ठेवणार, तेही फक्त १८ तारखेपर्यंतच अशी टीका देखील पाटील यांनी केली. आम्ही चुयेकर साहेबांच्या समाधीला अभिवादन करुन प्रचार शुभारंभ केला, महायुतीने काय केले? असा सवाल सतेज पाटलांनी उपस्थित केला.

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळच्या निवडणुकीसाठी आमदार सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील राजर्षी शाहू समविचारी आघाडीचा प्रचार शुभारंभ आज करण्यात आला. गोकुळचे संस्थापक आनंदराव पाटील चुयेकर यांच्या करवीर तालुक्यातील चुये येथील स्मारकाला अभिवादन करून प्रचाराला सुरुवात करण्यात आली. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते व माजी खासदार राजू शेट्टी, माजी आमदार सत्यजित पाटील सरुडकर यांच्यासह समविचारी आघाडीचे नेते उपस्थित होते.

## सायन रुग्णालयातील निवासी डॉक्टरची वसतिगृहात आत्महत्या

**मुंबई** : लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय अर्थात सायन रुग्णालयातील एका निवासी डॉक्टरने वसतिगृहातील आपल्या खोलीत आत्महत्या केल्याची घटना शनिवारी संध्याकाळी उघडकीस आली. डॉ. शिवचरण आप्पा पाटील असे मृत डॉक्टरचे नाव आहे. ते रुग्णालयाच्या सर्जरी विभागात पदव्युत्तर पदवीच्या (एमएस) पहिल्या वर्षात शिक्षण घेत होते. या घटनेमुळे रुग्णालय परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. प्राथमिक माहितीनुसार, भूल देण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या औषधाचा अतिडोस घेतल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र, मृत्यूचे नेमके कारण आणि घटनेमागील परिस्थिती तपासातून स्पष्ट होणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी संध्याकाळी डॉ. शिवचरण पाटील हे वसतिगृहातील त्यांच्या खोलीत होते. बराच वेळ होऊनही खोलीचा दरवाजा उघडला जात नसल्याने संबंधितांना संशय आला. त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांकडून पुढील कार्यवाही करण्यात आली.

डॉक्टरला तातडीने वैद्यकीय मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला की नाही, तसेच घटनास्थळी नेमकी कोणती परिस्थिती आढळली, याबाबत अधिकृत तपशील समोर येणे बाकी आहे. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. प्राथमिक तपासात डॉ. पाटील यांनी भूल देण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या औषधाचा अतिडोस घेतल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, कोणते औषध वापरण्यात आले, त्याचे प्रमाण किती होते आणि मृत्यू नेमका कशामुळे झाला, याची अधिकृत पुष्टी झालेली नाही. वैद्यकीय तपासणी आणि पोलिसांच्या पुढील चौकशीतून या बाबी स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

या प्रकरणी पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू केला आहे. घटनेशी संबंधित परिस्थिती, डॉक्टरची पार्श्वभूमी आणि मृत्यूचे नेमके कारण याबाबत तपास केला जात आहे. घटनास्थळावरील परिस्थिती आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

दरम्यान, डॉ. शिवचरण पाटील यांच्या मृत्यूमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचण्यापूर्वी पोलिसांच्या तपासातून समोर येणाऱ्या अधिकृत माहितीची प्रतीक्षा आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १२ ऑक्टोबर २०२६

## धम्मभूमी, बुद्धलेणीत श्रामणेर शिबिराचा प्रारंभ; त्रिशरण, पंचशीलाने धम्मशिक्षणाला सुरुवात



**छत्रपती संभाजीनगर :** धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरातील धम्मभूमी, बुद्धलेणी येथे आयोजित दहा दिवसीय श्रामणेर शिबिराला १० ऑक्टोबरपासून प्रारंभ झाला आहे. पूज्य भिक्खू विशुद्धानंद बोधी महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरात १२ वर्षांवरील मुलांसह इच्छुक ५० जणांना प्रव्रज्या देण्यात आली आहे. शिबिराच्या प्रारंभी भदंत विशुद्धानंदबोधी महास्थवीर, भदंत संघप्रिय थेरो, भदंत नागसेनबोधी थेरो, भदंत सुमनसरी, भदंत डॉ. चंद्रबोधी, भदंत बोधीधम्म, भन्ते राहुल आणि भन्ते निर्वाण यांच्या उपस्थितीत त्रिशरण, पंचशील व परित्राणपाठाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी शोभा केदारे, संघरत्न बोराडे, संघमित्रा मगर आणि रोहित केदारे परिवाराच्या वतीने भिक्खू संघाला फळदान व भोजनदान करण्यात आले. तसेच लव्हाळे परिवाराच्या वतीने भिक्खू संघाला खीरदान करण्यात आले. या दानाच्या माध्यमातून संबंधित परिवारांनी दानपारमितेचा बौद्ध संस्कार जपत भिक्खू संघाप्रती श्रद्धा व आदरभाव व्यक्त केला. या शिबिरात सहभागी झालेल्यांना त्रिशरण, पंचशील, परित्राणपाठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या २२ प्रतिज्ञा तसेच ध्यानसाधना यांविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या विषयांचे अध्ययन व पाठांतरही करून घेतले जाणार आहे. बुद्धांच्या विचारांची ओळख करून देणे, धम्माचे प्राथमिक ज्ञान रुजविणे आणि नैतिक मूल्यांची जपणूक करणारे सुजाण नागरिक घडविणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश आहे. १० ते २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत चालणाऱ्या या शिबिराच्या माध्यमातून सहभागी व्यक्तींना धम्मशिक्षण आणि ध्यानसाधनेची संधी उपलब्ध झाली आहे.

यावेळी उपासक प्रा. गुणरत्न सोनवणे, अमरदिप हिवराळे, प्रा. अविनाश सावंत, दादाराव सोनटक्के, अनिल नवगिरे, दादाराव खरात, अंजू खरात, गौरव खरात आणि पल्लवी खरात यांच्यासह अनेक उपासक-उपासिका उपस्थित होते. प्रज्ञा प्रसार धम्म संस्कार केंद्र, धम्मभूमी बुद्धलेणी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर यांच्या वतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

## परभणीत ८५ होमगार्ड जवानांना विशेष प्रशिक्षण; उजळणी शिबिराचा उत्साहात समारोप



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : जुना पेडगाव रोड येथील जिल्हा प्रशिक्षण केंद्रात होमगार्ड कार्यालयाच्या मैदानावर महाराष्ट्रातील पहिल्या मानसेवी अधिकारी वर्गाच्या उजळणी प्रशिक्षण शिबिराचा समारोप ५ ऑक्टोबर रोजी झाला.या शिबिरात परभणी जिल्ह्यातील सुमारे ८५ होमगार्ड जवानांना शारीरिक कवायत, पद कवायत, काठी प्रशिक्षण, श्री नॉट श्री (३०३) रायफल शस्त्र प्रशिक्षण यांसह विविध बाबींचे प्रशिक्षण देण्यात आले.प्रशासकीय अधिकारी किशोर राठोड यांच्यासह मान्यवरांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या जवानांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक करण्यात आले.

## डाक विभागाचा नावलौकिक वाढवण्यासाठी सर्वांनी उद्दिष्ट पूर्ण करावे : डाक अधीक्षक एस. आर. पाठक यांचे आवाहन



**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** उपविभागातील कर्मचाऱ्यांनी 'ईच वन इन्स्युअर वन' (EOIO) या मोहिमेत बजावलेल्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत माननीय डाक अधीक्षक श्री. एस. आर. पाठक यांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि भेटवस्तू देऊन कर्मचाऱ्यांचा शुक्रवार रोजी विशेष गौरव करण्यात आला.तसेच २०२६-२७ या चालू आर्थिक वर्षात पोस्ट ऑफिस सेव्हिंग्स बँक (POSB) योजनेमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या जीडीएस बीपीएम (GDS BPM) कर्मचाऱ्यांचाही या प्रसंगी सत्कार करण्यात आला.या विशेष सत्कार सोहळ्याच्या प्रसंगी डाक अधीक्षक सतीश पाठक, परभणीचे सहाय्यक डाक अधीक्षक गणेश देशमाने, जिंतूर उपविभागाचे डाक निरीक्षक बालासाहेब शिंदे, मार्केटिंग ऑफिसर सचिन कदम, जिंतूरचे पोस्टमास्टर शेख इरशाद, भगवानराव वैद्य, गजानन जाधव आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते. उपस्थितांना मार्गदर्शन करताना मान्यवर अधिकाऱ्यांनी, चालू आर्थिक वर्षात सर्व कर्मचाऱ्यांनी दिलेली उद्दिष्टे पूर्ण करून विभागाचा नावलौकिक वाढवावा, असे आवाहन केले. या कार्यक्रमास जिंतूर उपविभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## किनगाव राजा येथील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या जमिनीचा व्यवहार संशयाच्या भोवऱ्यात!



**बुलढाणा (महेश मुंढे) :** किनगाव राजा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मालकीच्या अंदाजे ८१ गुंठे जमिनीच्या खरेदी-विक्री व हस्तांतरणाच्या व्यवहाराची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी आणि संबंधित लाभार्थ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी ठाम मागणी करणारे निवेदन १) सतिष एकनाथ दराडे २) रामेश्वर देवराव काकड ३)गणेश बद्रीनाथ डोईफोडे व ग्रामस्थ किनगाव राजा यांनी उपविभागीय अधिकारी, सिंदखेड राजा यांच्याकडे सादर करण्यात आले आहे. सार्वजनिक संस्थेच्या मालकीच्या जमिनीच्या व्यवहाराबाबत प्रश्न उपस्थित झाल्याने या प्रकरणाकडे आता प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे.या निवेदनात सार्वजनिक संस्थेच्या मालकीच्या जमिनीची विक्री अथवा हस्तांतरण नेमके कोणत्या अधिकाराने, कोणत्या ठरावाच्या आधारे आणि कोणत्या शासकीय परवानग्यांनुसार करण्यात आले, याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.जमीन विक्रीचा ठराव कुठे आहे? परवानग्या घेतल्या होत्या का?सदर जमिनीच्या व्यवहारासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीने कोणता ठराव मंजूर केला होता, विक्रीपूर्वी सक्षम प्राधिकरणाची आवश्यक परवानगी घेण्यात आली होती का, तसेच संपूर्ण व्यवहार कायदेशीर आणि पारदर्शक पद्धतीने झाला होता का, याची कागदपत्रांसह तपासणी करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.तसेच जमिनीच्या मालकी हक्काची कागदपत्रे, फेरफार नोंदी, महसूल अभिलेख, नोंदणी दस्त आणि संबंधित इतर कागदपत्रांची सखोल पडताळणी करून व्यवहारातील वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.जमिनीच्या विक्रीतून प्राप्त झालेली रक्कम बाजार समितीच्या खात्यात जमा झाली होती का, त्या रकमेचा वापर कोणत्या कारणासाठी करण्यात आला आणि संपूर्ण आर्थिक व्यवहाराची नोंद नियमानुसार ठेवण्यात आली होती का, याची स्वतंत्र आर्थिक चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.या व्यवहारात कोणते अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी, मध्यस्थ किंवा लाभार्थी सहभागी होते, याचीही चौकशी करून संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी निवेदनकर्त्यांनी केली आहे.या प्रकरणाची चौकशी केवळ औपचारिकतेपुरती मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष कागदपत्रे, ठराव, नोंदणी दस्त, बँक व्यवहार आणि महसूल अभिलेखांच्या आधारे करण्यात यावी. चौकशीत कायद्याचे उल्लंघन किंवा अन्य गैरप्रकार आढळल्यास संबंधित जबाबदार व्यक्तींवर नियमानुसार कठोर कारवाई करून फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.प्रशासन आता काय भूमिका घेणार?या निवेदनामुळे किनगाव राजा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जमिनीच्या व्यवहाराबाबत उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची जबाबदारी संबंधित प्रशासनावर आली आहे. जमिनीच्या व्यवहाराची सत्यता तपासून चौकशीचा निष्कर्ष स्पष्ट करणे आणि दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करणे, ही आता महत्त्वाची बाब ठरणार आहे.सार्वजनिक मालमत्तेच्या व्यवहारात पारदर्शकता असलीच पाहिजे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे आणि दोषींना कायद्याच्या चौकटीत कठोर शासन करावे, अशी मागणी निवेदनकर्त्यांनी व ग्रामस्थ किनगाव राजा यांनी केली आहे

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १२ ऑक्टोबर २०२६


## नवरात्र महोत्सव निमित्त भव्य जपानुष्ठान व पर्जन्यमान साठी नवचंडी यज्ञाचे आयोजन



**छत्रपती संभाजीनगर :** येथून जवळच असलेल्या भागशीगड आश्रम येथे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेरविवार दि.११ ऑक्टोबर दि. १९ ऑक्टोबर दि. १९ सकाळी ०८ ते १२.३० नवचंडी यज्ञ व त्यानंतर प्रवचन व महाप्रसाद होईल. दैनिक कार्यक्रम जपानुष्ठाना व्यतिरिक्त दररोज सकाळी ५ ते ७ वाजेपर्यंत विधी, आरती, प्रवचन व सायं : ठिक ७ वा. श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज यांचे प्रवचन होईलप पु महामंडलेश्वर परमानंद गिरी महाराज यांनी आव्हान केले आहे"येणाऱ्या नवरात्र उत्सवादरम्यान दुष्काळाचे नियोजन करा, गरजा कमी ठेवा, किमान दीड वर्ष पुरेल एवढे पाणी साठा करून ठेवा, कमीत कमी खर्चात आपल्या गरजा भागवा आहे त्याच पाण्याचे नियोजन करून साठवणूक क्षमता वाढवा, आम्ही भांगशी माता गडावरील अव्याहतपणे वाहून जाणारे पावसाचे पाणी अडवून शेततळ्यात साठवले त्यामुळे आजही गडाच्याखाली पाणीची मुबलकता वाढवली आहे. या वर्षी अन्न धान्य असेल परंतु पाण्यासाठी भटकंती वाढू शकते.असे त्यांनी सांगितले आहे.

## क्रीडा स्पर्धेत अंजना स्कूल ऑफ एक्सलन्सच्या विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी!



**खुलताबाद (जावेद अहमद) :** विविध मैदानी स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी पटकावली प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची पारितोषिके; जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवडजिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने आयोजित गंगापूर तालुकास्तरीय आंतरशालेय क्रीडा स्पर्धांमध्ये अंजना प्रतिष्ठान संचलित अंजना स्कूल ऑफ एक्सलन्सच्या विद्यार्थ्यांनी विविध मैदानी क्रीडा प्रकारांत घवघवीत यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी भालाफेक, हातोडाफेक, थाळीफेक, उंच उडी, लांब उडी, तिहेरी उडी व धावणे अशा विविध क्रीडा प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी करत तालुकास्तरावर आपला ठसा उमटवला आहे.१९ वर्षांखालील वयोगटात पृथ्वीराज राजपूत याने भालाफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला, तर कार्तिक मोरे याने हातोडाफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. जीवन डांगोडे याने लांब उडी स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले.१७ वर्षांखालील वयोगटात ओम निकम याने उंच उडी स्पर्धेत प्रथम क्रमांक, तर ध्रुव वाटाणे याने भालाफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. प्रेम चंदेल याने भालाफेक स्पर्धेत द्वितीय क्रमांक, आराध्या उबाळे हिने तिहेरी उडी स्पर्धेत द्वितीय क्रमांक, तर सृष्टी पाटुळे हिने लांब उडी स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवत शाळेचा नावलौकिक वाढवला.१४ वर्षांखालील वयोगटात वरद गवळी याने थाळीफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत उत्कृष्ट कामगिरी केली.या स्पर्धांमध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी एकूण ९ पारितोषिके पटकावली असून, त्यामध्ये ५ प्रथम, २ द्वितीय आणि २ तृतीय क्रमांकांचा समावेश आहे. या यशाबद्दल अंजना स्कूल चे संस्थापक अध्यक्ष शंकर पल्हाळ,अध्यक्षा स्मिता पल्हाळ,उपाध्यक्षा मोनिका पल्हाळ,सचिव स्वर्णजित पल्हाळ, प्राचार्या स्नेहा पवार, व्यवस्थापक देव साठे, क्रीडा शिक्षक आकाश इंगळे यांनी विशेष अभिनंदन केले.

## पाटोद्याच्या जयभवानी महाविद्यालयाचा पै. प्रणव आवारे ९० किलो ग्रिको कुस्तीत विभागात प्रथम : राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा येथिल जय भवानी महाविद्यालयाचा विद्यार्थी पै.प्रणव उर्फ गणेश आवारे यांनी शालेय क्रिडा स्पर्धेत महाविद्यालयाचे व पाटोदा तालुक्याचे नाव कुस्ती क्षेत्रात उंचवणारी उल्लेखनीय कामगिरी करत प्रणव आवारे याने ९० किलो वजन गटातील ग्रिको - रोमन कुस्ती प्रकारात मराठवाडा विभागात सर्व प्रथम येण्याचा बहुमान मिळवून जय भवानी महाविद्यालयाच्या शिरपेचात आजुन एक मानाचा तुरा रोवला.या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्याची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जय भवानी महाविद्यालयाचे विद्यार्थी विविध क्रिडा स्पर्धमध्ये सातत्याने सहभागी होत असून आपल्या कामगिरीच्या जोरावर महाविद्यालयाची यशस्वी परंपरा. कायम राखत आहेत. ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व संधी निर्माण करून दिल्यास ते तालुका,जिल्हा,विभागीय,राज्यस्तरीय,राष्ट्रीय पातळीपर्यंत उत्तुंग कामगिरी करू शकतात.हे या यशातुन पुन्हा एकदा सिध्द झाले आहे.या कुस्ती स्पर्धेत प्रणव आवारे याने दमदार खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यावर मात करून हा विजय मिळवला आहे.त्याच्या या यशामुळे कुटुंबीय, प्रशिक्षक, ज्ञमित्रपरिवार व कुस्तीप्रेमीकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. प्रणव आवारे यास वस्ताद बाळासाहेब आवारे,वस्ताद करण आवारे, वस्ताद ज्ञानेश्वर संकुटे क्रिडा विभागाचे प्रा.गोपाळ धांडे, प्रा.डॉ. प्रविण शिलेदार,आदिचे मार्गदर्शन लाभले.कठोर सराव,जिद्द आणि मेहनतीच्या बळावर मिळविलेल्या दैदिप्यमान यशामुळे पै.प्रणव उर्फ गणेश आवारे याचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री मा. श्री. शिवाजीराव दादा पंडित, अध्यक्ष माजी आ.श्री. अमरसिंह पंडित, सचिव, मा.श्री. जयसिंह पंडित, आ.श्री. विजयसिंह पंडित, युवा नेते श्री. रणवीर काका पंडित, युवा नेते श्री.पृथ्वी दादा पंडित, मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम, प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे, विकास समितीचे सदस्य मा.श्री.दिलीपराव जाधव व सर्व प्राध्यापक वृंद यांनी अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या...!




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १२ ऑक्टोबर २०२६


## आकाशाला गवसणी घालण्यासाठी बीडच्या तरुणींना नवी दिशा!




**बीड (भगवंत पाळवदे) :** आकाशात झेप घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्या बीड जिल्ह्यातील तरुणींना व्यावसायिक वैमानिक (कमर्शियल पायलट) होण्याची दिशा देणारा 'Giving Wings to Fly' हा करिअर मार्गदर्शन कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयातील डीपीडीसी (नियोजन भवन) सभागृहात उत्साहात पार पडला. बीड जिल्हा प्रशासनाच्या वतीने इंडिगोच्या सीएसआर उपक्रमांतर्गत आणि 'भारत केअर्स'च्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार तसेच जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील महिला सक्षमीकरणाच्या या उपक्रमास सुरुवात झाली आहे. जिल्हा प्रशासनाच्याu पुढाकाराने आयोजित हा कार्यक्रम अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने यशस्वीरित्या संपन्न झाला.या वेळी जिल्हा नियोजन अधिकारी शीला मिसाळ, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी राधाकृष्ण इघारे, सावरकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, मिलिया महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. सीमा हाश्मी, मुख्यमंत्री फेलो तेजश्री वावरे आणि प्रतीक मखीजा यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील मोठ्या संख्येने विद्यार्थिनींनी कार्यक्रमास उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.'भारत केअर्स'चे प्रकल्प व्यवस्थापक कल्पेश मोहोड आणि मास्टर ट्रेनर रुपेश गाडेकर यांनी उपक्रमाची सविस्तर माहिती दिली. विमान वाहतूक क्षेत्रातील करिअरच्या संधी, व्यावसायिक वैमानिक होण्यासाठीची पात्रता, प्रशिक्षण आणि निवड प्रक्रिया याबाबत त्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. पारंपरिक करिअरच्या पर्यायांबरोबरच विमान वाहतूक क्षेत्रातील संधींचाही विचार करावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. निवड झालेल्या पात्र विद्यार्थिनींना कमर्शियल पायलट होण्यासाठी मोफत प्रशिक्षण व साहाय्य दिले जाणार आहे.या उपक्रमासाठी अर्ज करणारी उमेदवार भारतीय नागरिक असलेली महिला असावी. तिचे वय 1 मे 2026 रोजी 18 ते 35 वर्षे दरम्यान असणे आवश्यक आहे. उमेदवाराने इयत्ता बारावी इंग्रजी, भौतिकशास्त्र आणि गणित या विषयांसह उत्तीर्ण केलेली असावी, तसेच बारावीत प्रत्येक विषयात किमान 51 टक्के गुण मिळवलेले असावेत. उमेदवाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ₹8,00,000 (आठ लाख रुपये) पेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थिनींनी पायलट प्रशिक्षण, अभ्यासक्रम, पात्रता आणि विमान वाहतूक क्षेत्रातील करिअरविषयी विविध प्रश्न विचारले.

संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्रामुळे त्यांच्या शंकांचे निरसन झाले. या संवादातून विमान वाहतूक क्षेत्रातील संधी, आवश्यक तयारी आणि उज्ज्वल करिअरच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी त्यांना प्रेरणा मिळाली. 'गिव्हिंग विंग्स टू फ्लाय' उपक्रमाच्या दुसऱ्या बॅचसाठी अर्ज रोलिंग पद्धतीने स्वीकारले जात असून, पूर्ण अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख 31 ऑक्टोबर आहे. बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र व होतकरू विद्यार्थिनींनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## हिप्परगा आई अंबाबाई मंदिरात घटस्थापनेने शारदीय नवरात्रोत्सवास उत्साहात सुरुवात



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील नेहरू नगर येथील जागृत देवस्थान श्री हिप्परगा आई अंबाबाई देवस्थान मंडळात आज शारदीय नवरात्रोत्सवाची घटस्थापना मोठ्या भक्तिभावात करण्यात आली. सकाळी १०.००वा. शुभ मुहूर्तावर पुजाऱ्यांच्या हस्ते घटस्थापना करण्यात आली. यावेळी परिसरातील महिला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.मंडळाच्या वतीने यावर्षी नवरात्रात विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. रोज सकाळ-संध्याकाळ आरती, भजन, तसेच सातव्या माळेला पारंपरिक देवीचा पाळणा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. नऊ दिवस देवीला नऊ रंगांच्या साड्या परिधान केल्या जाणार असून, भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उत्सव यशस्वी करण्यासाठी देवस्थान मंडळाचे सर्व पदाधिकारी आणि नेहरू नगर मधील युवक परिश्रम घेत आहेत.

## लोकशाहीचा अंतिम बुरुज आणि संविधानाची कसोटी



"सरकारी दमनशाहीपुढे सुप्रीम कोर्टही निष्प्रभ ठरतय का?" हा प्रश्न केवळ कायदेशीर किंवा राजकीय वादापुरता उरलेला नसून,तो भारतीय लोकशाहीच्या आत्म्याला विचारलेला एक गंभीर प्रश्न आहे.जेव्हा सत्ता उन्मत्त होऊन विरोधकांचे आवाज दाबते आणि सर्व प्रशासकीय यंत्रणा पालापाचोळ्यासारख्या उडून जातात,तेव्हा नागरिकांची शेवटची आशा म्हणून सर्वोच्च न्यायालयाकडे पाहिले जाते.परंतु,हीच न्याययंत्रणा जर राजकीय समीकरणांच्या किंवा दबावाच्या चक्रात अडकून निष्प्रभ वाटू लागली,तर संविधानातील स्वातंत्र्य,न्याय आणि समतेचे शब्द कागदावरच बंदिस्त राहण्याचा धोका निर्माण होतो.सर्वोच्च न्यायालय हे संविधानाचे अंतिम रक्षक आहे; मात्र सत्तेच्या पोलादी पंजांसमोर न्यायाची वाणी मूक झाली,तर न्यायालयाचे अस्तित्व केवळ एक उपचार उरते.जरी आजच्या परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असले आणि ती काहीशी बचावात्मक दिसत असली,तरी इतिहास सांगतो की सत्तेच्या कर्णकर्कश रणशिंगापेक्षा संविधानाचा अंतःस्थ प्रकाश आणि नागरिकांचा जिवंत विवेक नेहमीच अधिक शक्तिशाली असतो.सुप्रीम कोर्ट पूर्णपणे निष्प्रभ ठरले का,याचा निर्णय काळच करेल; पण जेव्हा जेव्हा न्यायमूर्ती संविधानाच्या साक्षीने ठामपणे उभे राहतात,तेव्हा सत्तेचे सिंहासनही हादरते.न्यायालयाची खरी ताकद केवळ त्याच्या भव्य इमारतीमध्ये नसून,ती लोकशाही मानणाऱ्या जिवंत जनमानसात दडलेली आहे.

**विजय म्हस्के पाटील**
मो.नं. 9595401111
छत्रपती संभाजीनगर शहर


## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १२ ऑक्टोबर २०२६

# पुन्हा कोयता

त्यांच्या शाळेच्या पाटीवर
उमटली अक्षरं आ आ इ
फुलली डोळ्यांत स्वप्नं
जग सारं जिंकण्याची

पण ऐन दिवाळी दसऱ्यात
सुटली शाळा
दर वर्षी प्रमाणे
वाट्याला फडं ऊसाची आल्यानं

जगण्याच्या ओढाताणीत
सुटलं दप्तर
हरवलं बालपण
गडप झालं अंधारकोठडीत
उद्याचं सोनेरी भविष्य

पुन्हा तोच मुकर्दम
तोच उचल
तोच फड
तीच जळजळ डोळ्यातली
अणकुचीदार स्वप्नांची

अशा कितीतरी
कोवळ्या हातातून
सुटल्या लेखण्या
अन् आला कोयता

अशा कितीतरी पिढ्यांच
मातीमोल केलं जगणं
या उसाच्या फडातील कोयत्यानं

तेव्हा कुठं मिळाली साखर
पण साखरेला माहित नाही
तिची झाली कशी साखर
किती स्वप्नाचा चुराडा करून
गोड झाली साखर..



**ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड

# विद्यापीठाच्या सेंट्रल झोन मैदानी स्पर्धेत श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाची सुवर्णभरारी




**उमरगा :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन सेंट्रल झोन मैदानी स्पर्धेत येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयांच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. श्री विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर येथे दि. ८ व ९ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या या स्पर्धेत महाविद्यालयाच्या खेळाडूंनी एक सुवर्णपदक आणि दोन रौप्यपदकांची कमाई केली.या स्पर्धेत महाविद्यालयाची खेळाडू राजनंदिनी शिवाजी सूर्यवंशी हिने १० हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदक पटकावले. तर सानिया लाल शेख हिने १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवून रौप्यपदक प्राप्त केले. ४×४०० मीटर रिले धावण्याच्या स्पर्धेतही महाविद्यालयाच्या संघाने दमदार कामगिरी करत द्वितीय क्रमांक मिळविला. या संघात हर्षदा बळीराम चाकुरे, सानिया लाल शेख, राजनंदिनी शिवाजी सूर्यवंशी, अंकिता श्याम जाधव आणि प्रणिता प्रमोद पाटील या विद्यार्थिनींचा समावेश होता. या यशामुळे महाविद्यालयाच्या खेळाडूंनी विद्यापीठीय क्रीडा स्पर्धेत आपली गुणवत्ता सिद्ध केली.खेळाडूंनी मिळविलेल्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य डॉ. विनोद देवरकर आणि उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, प्रा. जी . एस. मोरे, प्रा. शैलेश महामुनी आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. खेळाडूंना प्रा. डॉ. राजेंद्र सूर्यवंशी यांचे मार्गदर्शन लाभले.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक,
आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य
Sanitary Health Inspector
सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर
या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे,
हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा,
छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १२ ऑक्टोबर २०२६


# अहिराणीच्या प्रतिष्ठेसह मराठीतली महत्वाची कादंबरी

डॉ. सुधीर राजाराम देवरे यांची 'जीवदान' ही कादंबरी असून कथानक पूर्णपणे फिक्शन आहे, आत्मकथन नाही. कादंबरीकाराने वास्तवाला कल्पनेची अशी काही जोड दिली आहे की तिच्यात वास्तवाचा भास व्हावा, असा या कलाकृतीचा आविष्कार अतिशय नैसर्गिक वाटतो. ह्या 'जीवदान' कादंबरीची कथावस्तू आणि मध्यवर्ती संघर्ष भयानक पध्दतीनं पुढं येतो. कादंबरीचा गाभा एका कौटुंबिक हिंसाचाराच्या चक्राभोवती फिरत राहतो. 'जीवदान' या शब्दाचीच विडंबना ही कादंबरीची मध्यवर्ती कल्पना आहे, असं लक्षात येतं. यशोदा बाईनं दादांना दिलेलं 'जीवदान' हे आईसाठी 'मृत्यूदान' ठरतं. आणि त्याच प्रतिशोधातून नायकाच्या हातून ठरवून बापाचा थंडपणे निघृण खून घडतो. इथं कोणीही पूर्णपणे बळी नाही आणि कोणीही पूर्णपणे गुन्हेगार नाही. हीच कादंबरीची नैतिक गुंतागुंत शेवटपर्यंत पहायला मिळते. या कादंबरीची संपूर्ण कथा बाल सुधारगृहातील नायकाच्या डायरीतून उलगडत जाते. त्यामुळं भूतकाळ आणि वर्तमानकाळ एकमेकांत मिसळतात. शेवटी ती डायरी 'सिनेमावाला जहांगीरदार' कडे जाते- म्हणजे वैयक्तिक आघात सार्वजनिक कथा बनते. इथं लेखक वर्तमानपत्री बातम्यांमधून "आघाताचे व्यावसायिकीकरण" हा सूक्ष्म प्रश्न उपस्थित करतात, असं वाटतं. कादंबरीचं पात्रनिरूपण पहाण्यासारखं आहे. नायक फक्त 'खुनी' नाही, तो एक आघातग्रस्त मुलगा आहे. त्याच्या डायरीतून येणारा पश्चात्ताप, आठवणी आणि 'लवकरात लवकर गोष्ट पूर्ण करायची' घाईसुध्दा त्याची मानसिक अस्वस्थता दाखवते. यशोदा या नावातच 'जीवदान' आहे. पण तिच्या कृतीचे परिणाम विध्वंसक आहेत. ती खलनायिका नाही, ती एका व्यवस्थेचा भाग आहे. नायकाचे आई- वडील प्रतीक आहेत. वडील = सत्ता आणि हिंसा. आई = शोषणाची बळी. त्यांच्यातील संबंधातून संपूर्ण ग्रामीण कुटुंबसंस्थेवर कादंबरीत शोकांतिक भाष्य येतं. ह्या कादंबरीची भाषाशैली हे कादंबरीचं खरं शिल्प ठरतं. कादंबरीची कथा आणि उपयोजित भाषा यामुळंच कादंबरीचं फिक्शन अफलातून पुढं जात राहतं आणि वाचकाला शेवटपर्यंत कथेत बांधून ठेवतं. "कादंबरीतील संवादांमधून उपयोजित झालेली अहिराणी बोलीभाषा ही कथानक वास्तव, ताजंतवाणं आणि नैसर्गिक ठेवतं!" असं या कादंबरीबद्दल कुठंतरी वाचण्यात आलं, ते योग्यच आहे. डॉ. देवरे हे अहिराणी भाषेचे अभ्यासक आहेत. त्यामुळं इथली अहिराणी 'सजवलेली' नाही. ती जशी बोलली जाते तशीच आहे. आणि लेखकाच्या लेखणीतून आपोआप आलेली वाटते, भाषा इथं नटलेली, मुरवलेली, मेकअप केलेली नाही. 'पानी पी घिदं आनि बसनू' हे वाक्य प्रमाण मराठीत लिहिलं असतं तर कादंबरीचा आत्माच मरून गेला असता. यातून लेखकाचा १ जुलै २०२६ च्या ब्लॉगमधील सिद्धान्तच प्रत्यक्षात येतो- "बोलीभाषा ही त्या त्या ठिकाणी प्रमाणभाषाच आहे." ही भाषा केवळ सजावट नाही, तर ती पात्रांची परिस्थितीजन्य समुळ मानसिकता आणि त्यांचा परिवेश उभा करते. या विषयाचे ३ पदर आहेत. १. कौटुंबिक हिंसा : दारू, संशय आणि वर्चस्वातून घरात हिंसा कशी पिढ्यानुपिढ्या चालते हे कादंबरीत दाखवले आहे. २. कायदा आणि व्यवस्था : पोलीस, बाल सुधारगृह, कोर्ट- या सगळ्या यंत्रणा नायकाला 'गुन्हेगार' म्हणूनच बघतात. त्याच्या आघाताला जागा नाही. ३. कला आणि सत्य : दैनंदिनी सिनेमासाठी लिहिली जाते. म्हणजे सत्याला बाजारभाव येतो. कलाकारानं आपल्या वेदनेला विकावं का? हा आधुनिक प्रश्न इथं मुरवलेला आहे. या कादंबरीतील अनेक सामर्थ्ये लक्षात येतात. विषयाची धाडसी हाताळणी केली आहे. घरातील खून हा मराठी कादंबरीत नवीन नाही, पण तो बालकाच्या केवळ दृष्टीतून नव्हे तर हातून आणि आपल्या बोलीतून सांगणं हे नक्कीच नवीन आहे. कादंबरीत प्रादेशिकतेचा आग्रह धरून ठसा उमटवलेला आहे. खानदेशची माती, तिथली नाती, तिथली भाषा यांचं डॉक्युमेंटेशनही अनायासं झालं आहे. ओघवती व गतिमान शैली कादंबरी वाचनीय व्हायला मदत करते. कादंबरी वाचायला घेतली की संपेपर्यंत बाजूला ठेवता येत नाही, याचं कारण कथेचा वेग, वस्तुनिष्ठता, मजकुराची संपृक्तता आणि लेखकाचा प्रामाणिकपणा. अंतिम भागाची घाई झाली का, असं वाचकाला वाटू शकतं. डायरी पूर्ण करून ती जहांगीरदारांना सोपवणं हा शेवट थोडा पटकन आला. नायकाच्या पुढील आयुष्याबद्दल, त्याच्या पश्चात्तापाबद्दल अधिक जाणून घ्यायचं राहतं. नायकाच्या भवितव्याबद्दल अजून पुढं काही पाहिजे होतं अशी वाचकाला चुटपूट लागून राहते. पात्रांचा विस्तार अजून करता आला असता. आई, वडील, यशोदा ही पात्रं नायकाच्या आठवणीतूनच येतात. त्यांना स्वतंत्र आयाम मिळाला असता तर कादंबरी अजून पिळदार व घट्ट झाली असती. रूपकांच्या अभावातून आणि वास्तववादी शैलीमुळं कादंबरीला कधीकधी वाचक 'आत्मकथन' समजू लागतो. तो धोकाही या कादंबरीला आहे. प्रतिकात्मकतेची जागा कादंबरीत कमी असल्यानं वाचक शैलीत मंत्रमुग्ध होऊन जातो. हे सर्व वाचकाला लागलेल्या पुढच्या रूखरूखीमुळं जाणवतं आणि तो शेवटपर्यंत वाचत जातो. लेखकानं काही भाग वाचकांच्या कल्पनाशक्तीवर सोडून देणं हे चांगल्या कलाकृतीचं लक्षण आहे. ते लेखकानं साध्य करत ह्या कथेतून आपल्या ग्रामीण वास्तवावर नेमकं बोट ठेवलं आहे. कादंबरीची एकूण मांडणी ही अफलातून आणि आगळ्यावेगळ्या फिक्शनची आहे. खुनाची गोष्ट असूनही कादंबरी लोकप्रियतेकडे झुकण्यापेक्षा अभिजात होत जाते. 'जीवदान' ही अहिराणी बोलीत लिहिलेली एक काळी कादंबरी आहे, असंही म्हणता येईल. ती आपल्याला गैरसोयीचे प्रश्न विचारते- जेव्हा 'जीव वाचवणं' हेच दुसऱ्याचा जीव घेण्याचं कारण बनतं, अथवा आपली सोय लागावी म्हणून दुसऱ्याचा संसार उध्वस्त केला जातो तेव्हा नीती कुठं असते? जेव्हा राज्यसंस्था माणसाला समजून घेण्यापेक्षा फक्त 'केस नंबर' म्हणून बघते, तेव्हा त्याची वेदना कोण ऐकणार? डॉ. सुधीर देवरेंनी अहिराणीला केवळ बोली न ठेवता तिला प्रमाणित कादंबरीची प्रतिष्ठा दिली. त्यामुळं ही कादंबरी मराठी साहित्यातील प्रादेशिक आवाजांच्या रांगेत महत्त्वाचं स्थान पटकावते. मराठी साहित्यातील 'प्रादेशिक आवाज' म्हणून भालचंद्र नेमाडे, आनंद यादव असे काही साहित्यिक ओळखले जातात. सुधीर देवरे अहिराणीला तीच प्रतिष्ठा देत आहेत. भाषिक प्रामाणिकपणा आणि नैतिक गुंतागुंतीसाठी या कादंबरीचा कायम उल्लेख होत राहील. कादंबरी 'राजहंस' सारख्या प्रतिष्ठित प्रकाशकानं प्रकाशित केली ही अतिशय जमेची बाजू असूनही इतक्या महत्वाच्या कादंबरीचं मुखपृष्ठ अतिशय साधारण व संगणकावर तयार केलेलं असावं ही फार खटकणारी बाब आहे.

**'जीवदान' (लघुकादंबरी)**
**डॉ. सुधीर राजाराम देवरे**
**राजहंस प्रकाशन, पुणे**
**पृष्ठ : 120, मूल्य : 200 रु.**

# कवीकडून सामाजिक क्रांतीच्या कविता निर्माण व्हायला हव्यात... प्रा. डॉ. सतीश मस्के




**पिंपळनेर :** आज देशामध्ये खऱ्या अर्थाने धाकधुकीची परिस्थिती निर्माण झालेली दिसत आहे. माणूस अस्वस्थ आहे. त्याच्या जगण्याचे अनंत प्रश्न निर्माण होत अनेक आहेत. त्यामुळे कवींच्या कवितेतून सामाजिक क्रांती निर्माण होईल अशीच कविता जन्माला यायला हवी असे मत सुप्रसिद्ध कवी व समीक्षक प्रा. डॉ. सतीश मस्के यांनी आभासी ( गुगल मीट ) कविता वाचन कार्यक्रमात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना केले. यावेळी प्रोफेसर डॉ. रमेश जाधव व महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील नामवंत निमंत्रित कवी उपस्थित होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर मराठी भाषा व वाङ.मय विभागाच्या वतीने 3 ऑक्टोबर " अभिजात मराठी भाषा दिन " निमित्ताने कविता वाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रास्ताविक करताना मराठी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. रमेश जाधव म्हणाले की, मराठी भाषेला खूप वर्षाची परंपरा आहे. याच मराठी भाषेच्या माध्यमातून विविध प्रकारचे साहित्य निर्माण झालेले आहे म्हणूनच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे. ३ ऑक्टोंबर ते ९ ऑक्टोंबर हा "अभिजात मराठी भाषा सप्ताह म्हणून"पार पाडला जातो. त्यानिमित्तानेच मराठी विभागात कविता वाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या आभासी कवितावाचन कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून अनेक सुप्रसिद्ध कवी उपस्थित होते. आशा डांगे यांनी 'पोटाची भूख' व 'स्त्रीधर्म', देवानंद पवार यांनी 'पड पड रे पाण्या' व 'चमचा', डॉ. संतोष राठोड यांनी 'गौतम तिकडे कसे चालले' व 'आई', डॉ. सविता लोंढे यांनी 'गांधारी' व 'विठ्ठला', डॉ. सुदाम राठोड यांनी 'बाया आणि पाणी' व 'कचऱ्या पारधी का मारला गेला', प्रा. रामप्रसाद वाव्हळ यांनी 'तू भिरकावलेस दगड मीही भिरकावले दगड', राम जाधव यांनी 'वाट'व प्रा. केशरचंद राठोड आदींनी कवितांचे बहारदार, प्रेरणादायी कवितांचे वाचन करून कवी संमेलन गाजवले. या कवी संमेलनात विविध कवींनी वेगवेगळ्या कविता सादर केल्या. या कविता वाचन कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना पिंपळनेर ता. साक्री येथील कर्म.आ.मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सतीश मस्के म्हणाले की, मराठी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ.रमेश जाधव यांनी वेगवेगळ्या तळागाळातील कवींना अशा ठिकाणी संधी देणे तेही आजच्या परिस्थितीत महत्त्वाचे आहे. आजच्या अशा या कोलाहलामध्ये मराठी भाषेचा दर्जा टिकवून ठेवणे, भाषा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पोहोचविणे हेही महत्त्वाचे आहे. आजच्या डिजिटल युगामध्येही कवी आपल्या कवितांच्या माध्यमातून अनेकांच्या हृदयाचा ठाव घेत आहेत. त्यामुळे केवळ अभिजात भाषेचा दर्जा हा शिक्क्यापुरता मर्यादित न राहता तो सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि साहित्यिक वारसा चा दर्जा पुढे पुढे जात चाललेला दिसतो आहे. तो टिकवून ठेवावा हे कवींचे व साहित्यिकांचे महत्त्वाचे काम आहे असे सांगून ' हिंदुत्वाच्या नावाखाली' व ' परीक्षा ' त्या कवितेचे वाचन केले.या आभासी कवितावाचन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. केशरचंद राठोड यांनी केले तर आभार डॉ. आकाश पवार यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. रामेश्वर वाकणकर व प्रा. वाल्मीक वाघमारे यांनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मराठी विभागाचे विद्यार्थी त्याचबरोबर श्रोते,रसिक वर्ग मोठ्या प्रमाणावर उपस्थित होता.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १२ ऑक्टोबर २०२६


## दिक्षा पवार यांची रेल्वे समितीवर नियुक्ती



**छत्रपती संभाजीनगर :** येथील, महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष, दिक्षा दिपकनाथ पवार यांची दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागीय रेल्वे उपयोगकर्ता सल्लागार समितीवर (DRUCC) खासदार कल्याण काळे यांच्या नामनिर्देशित प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा सदस्यत्वाचा कालावधी १ सप्टेंबर २०२६ ते ३१ ऑगस्ट २०२८ असा दोन वर्षांचा राहणार आहे. दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक कार्यालयाकडून ५ ऑक्टोबर २०२६ रोजी यासंदर्भातील पत्र जारी करण्यात आले आहे. खासदार कल्याण काळे यांच्या नामनिर्देशनानुसार पवार यांची या समितीवर नियुक्ती करण्यात आली आहे. दिक्षा दिपकनाथ पवार या फुले, शाहू, आंबेडकर चळवळीतील अभ्यासू व्यक्तिमत्त्व असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील विद्यार्थी चळवळीतील नेत्या म्हणूनही परिचित आहेत. सामाजिक, वैचारिक आणि विद्यार्थी चळवळीतील त्यांच्या कार्याच्या पार्श्वभूमीवर त्यांची दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागीय रेल्वे उपयोगकर्ता सल्लागार समितीवर नियुक्ती झाली आहे. या समितीच्या माध्यमातून रेल्वे प्रवाशांचे प्रश्न, समस्या आणि सुविधांशी संबंधित विषय मांडण्याची जबाबदारी त्यांच्यावर असणार आहे.

या नियुक्तीबद्दल प्राचार्य सुनिल वाकेकर, प्रा. गुणरत्न सोनवणे, अमरदिप हिवराळे, अक्रम खान, प्रा. अविनाश सावंत आणि अमोल घुगे यांनी दिक्षा पवार यांचे अभिनंदन केले. तसेच, त्यांना पुढील सामाजिक व सार्वजनिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students

Government Recognised

Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT | X-RAY | C.T.-SCAN | E.C.G. | Radiology | Physiotherapy | Optometry

O. T. TECHNICIAN

PG Radiology

Contact: 9405109103 8830838903


# पाच वर्षापासून तिफणचा नवरात्रात जागर कवितेचा

नवरात्र म्हणजे मातृशक्तीचा उत्सव. नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवात आपण आदिशक्तीच्या विविध रूपांची पूजा करतो, तिचा जागर करतो. पण या पारंपरिक पूजेसोबतच आपल्या अवतीभवती वावरणाऱ्या जिवंत मातृशक्तीचा, म्हणजेच आजच्या स्त्रीचा सन्मान शब्दांनी व्हावा, तिच्या वेदना, संवेदना, संघर्ष आणि कर्तृत्वाला वाचा फुटावी, या उदात्त आणि व्यापक हेतूने त्रैमासिक तिफण, तिफण वेब पोर्टल आणि भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने २०२० पासून नवरात्र उत्सवानिमित्त 'जागर कवितेचा' हा अभिनव ऑनलाइन कविसंमेलन उपक्रम अविरतपणे राबवला जात आहे. यंदा या उपक्रमाने सहाव्या वर्षात पदार्पण केले असून गेली पाच वर्षे हा जागर न चुकता सुरू आहे.कोरोनाचा काळ हा सर्वांसाठीच अत्यंत कठीण काळ होता. २०२० मध्ये सर्व सार्वजनिक कार्यक्रम बंद होते, मंदिरे बंद होती, साहित्य संमेलने, कविसंमेलने रद्द झाली होती आणि माणसे घरात अडकून पडली होती. साहित्यिक चळवळही जवळपास थांबली होती. अशा अंधकारमय काळात साहित्याचा दिवा विझू नये, संवाद तुटू नये म्हणून तिफणने तंत्रज्ञानाचा आधार घेतला. ऑनलाइन माध्यमाचा वापर करून कवयित्रींना एकत्र आणत समस्त मातृशक्तीला वंदन करणारा हा उपक्रम २०२० मध्ये प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आला. पहिल्या वर्षाची अधिकृत नोंद जरी आज उपलब्ध नसली तरी त्या वर्षी पेरलेले हे छोटंसं बीज पुढे मोठा वटवृक्ष बनलं हे निश्चित. त्या पहिल्या प्रयोगाला मिळालेल्या प्रतिसादामुळेच या उपक्रमाला पुढे अधिकृत स्वरूप देण्याचा निर्णय घेण्यात आला.२०२१ पासून या उपक्रमाने अधिकृत, संघटित आणि व्यापक स्वरूप धारण केले. १४ ऑक्टोबर २०२१ रोजी सायंकाळी ७ वाजता झालेले 'जागर कवितेचा' हे ऑनलाइन कविसंमेलन ही पहिली सविस्तर उपलब्ध नोंद मानली जाते. या कार्यक्रमाच्या उद्घाटक म्हणून आकाशवाणी औरंगाबाद केंद्राच्या कार्यक्रम अधिकारी नम्रता फळके होत्या, तर अध्यक्ष म्हणून मराठवाड्यातील प्रख्यात कवयित्री व लेखिका डॉ. उर्मिला चाकूरकर यांनी धुरा सांभाळली होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवयित्री माधुरी चौधरी यांनी अत्यंत ओघवत्या शैलीत केले होते. या पहिल्याच अधिकृत कार्यक्रमात महाराष्ट्रभरातून नऊ निमंत्रित कवयित्री सहभागी झाल्या होत्या. यामध्ये छाया जायभाये, सत्यशीला तौर, संध्या महाजन, रंजना सानप, निशा डांगे, आशा डांगे, वैशाली खंदारे, उज्ज्वला कोल्हे, भारती सोलुंके यांचा समावेश होता. घरबसल्या आपल्या कविता सादर करणे आणि त्या थेट प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणे हा अनुभव सर्वांसाठीच नवा होता, पण या कार्यक्रमाला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला.या प्रतिसादाचा विचार करून तिफणने हा उपक्रम दरवर्षी नवरात्रात घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षी या उपक्रमाचा विस्तार झपाट्याने झाला. तिसऱ्या वर्षी २३ ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध कवयित्री प्रिया धारूरकर होत्या तर उद्घाटक म्हणून सुप्रसिद्ध कवयित्री ज्योती धर्माधिकारी उपस्थित होत्या. या वर्षी संयोजक म्हणून त्रैमासिक तिफणचे संपादक प्रा. डॉ. शिवाजी हुसे आणि प्रा. डॉ. सर्जेराव जिगे यांनी काम पाहिले. निमंत्रक म्हणून ज्योती सोनवणे आणि माधुरी चौधरी यांनी तर सूत्रसंचालक म्हणून वैशाली खंदारे यांनी जबाबदारी सांभाळली. या वर्षी सहभागी होणाऱ्या कवयित्रींची संख्या आणि भौगोलिक व्याप्ती दोन्ही लक्षणीयरीत्या वाढली. मनीषा रायजादे, माधवी देवळाणकर, मंगला चोरे, मीनाक्षी राऊत, मीरा शेंडगे, नीलिमा मेहते, अश्विनी कुलकर्णी, क्षमा बर्डे, संगीता महाजन अशा विविध जिल्ह्यांतील कवयित्री या मंचावरून जोडल्या गेल्या. यातून हा जागर केवळ मराठवाड्यापुरता न राहता संपूर्ण महाराष्ट्राचा जागर झाला.चौथ्या वर्षी म्हणजेच १० ऑक्टोबर २०२४ रोजी या कार्यक्रमाने अधिक वैचारिक आणि शैक्षणिक उंची गाठली. या वर्षी उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या डॉ. अपर्णा पाटील होत्या, तर अध्यक्ष म्हणून महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा येथील प्रसिद्ध कवयित्री तथा हिंदी विभागाच्या प्रा. डॉ. मीरा निचळे उपस्थित होत्या. त्यांच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमाला आंतरविद्यापीठीय आणि आंतरभाषिक महत्त्व प्राप्त झाले. या वर्षी चंदन तरवडे, शारदा दराडे, अनिता राठोड, वैशाली खंदारे, संध्या भोळे, माधवी देवळाणकर, निशा कापडे, कविता कठाणे या कवयित्रींनी सहभाग घेत आपल्या कवितांतून स्त्री जीवनाचे विविध पैलू मांडले.पाचव्या वर्षी म्हणजेच ३० सप्टेंबर २०२५ रोजी हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात साजरा झाला. या वर्षीच्या कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून नाशिकच्या ज्येष्ठ कवयित्री जयश्री वाघ आणि उद्घाटक म्हणून पुण्याच्या प्रसिद्ध कवयित्री गीता भावसार उपस्थित होत्या. या वर्षी निमंत्रित कवयित्रींमध्ये क्षमा बर्डे, मंदा नांदुरकर, जयश्री काळवीट, डॉ. मंगल सांगळे, डॉ. रेखा ढेरे, ज्योती वाघ, संगीता अरबुने, अंजली दीक्षित, शितल संखे या नऊ कवयित्रींनी आपल्या सशक्त कवितांनी मातृशक्तीचा जागर केला.या पाच वर्षांच्या वाटचालीचे सर्वात मोठे यश म्हणजे राज्यभरातील अनेक कवयित्रींना मिळालेले हक्काचे व्यासपीठ. अनेक नवोदित कवयित्री ज्यांना मोठे साहित्यिक व्यासपीठ मिळत नव्हते, त्यांना या ऑनलाइन मंचाने राज्यस्तरीय ओळख मिळवून दिली. विशेषतः ग्रामीण भागातील, शेतकरी कुटुंबातील कवयित्री, जी आर्थिक आणि भौगोलिक कारणांमुळे पुणे-मुंबईपर्यंत पोहोचू शकत नाही, तिला या माध्यमातून आपली कविता थेट रसिकांपर्यंत पोहोचवण्याची संधी मिळाली. गुगल मिटवर होणाऱ्या या कार्यक्रमाला दरवर्षी शेकडो रसिक प्रेक्षक ऑनलाइन उपस्थित असतात.या संपूर्ण उपक्रमाचे शिल्पकार प्रा. डॉ. शिवाजी हुसे आहेत. ग्रामीण साहित्य, शेतकरी आणि बोलीभाषेला केंद्रस्थानी ठेवणारे तिफण हे एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे. डॉ. हुसे म्हणतात, नवरात्रात आपण देवीची पूजा करतो, पण आपल्या अवतीभवती असणाऱ्या जिवंत स्त्रीच्या वेदना आणि कर्तृत्व आपण विसरतो. त्या जिवंत स्त्रीशक्तीला वंदन करणे हा या जागरामागचा हेतू आहे.या उपक्रमाच्या यशामागे निमंत्रक ज्योती सोनवणे आणि माधुरी चौधरी यांचे मोठे योगदान आहे. सूत्रसंचालन वैशाली खंदारे, माधुरी चौधरी आणि वृषाली सोनवणे यांनी सांभाळले आहे. आज 'जागर कवितेचा' हे केवळ कविसंमेलन न राहता एक चळवळ बनली आहे. तिफणच्या या उपक्रमामुळे साहित्यातील स्त्री-हस्तक्षेप अधिक ठळक झाला आहे. सहाव्या वर्षात पदार्पण करत असताना हा उपक्रम याही वर्षी तितक्याच उत्साहात सुरू राहणार आहे.

**डॉ. शिवाजी हुसे**

संयोजक : तिफण जागर कवितेचा